**प्रेस नोट ता.१७/०६/२०२०**

**निगडी येथील ए.टी.एम.मशिन चोरीचा गुन्हा उघड, सराईत गुन्हेगारांना अटक**

**पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ व विशेष तपास पथकाची ची कारवाई**

दि.९/०६/२०२० रोजी थरमॅक्सचौक, नवमी हॉटेलचे शेजारी असलेले आय.सी.आय.सी.आय बँकेचे ए.टी.एम. मशिन अनोळखी १८ ते ३० वयोगटातील ५ इसमांनी महिंद्रा पिकअप गाडीला बांधुन ओढुन ए.टी.एम. मशिन त्यामधिल ५,७१,०००/- रू रोख रक्कमेसह ए.टी.एम. मशिन महिंद्रा पिकअप मध्ये टाकुन चोरून नेले होते.सदर बाबत निगडी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं.२१८/२०२० भादवि कलम ४५७,३८०,४२७,३४ प्रमणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा लॉकडाऊनचे काळात घडला असल्याने तो आजुबाजुच्या आसपासच्या परीसरातील चोरट्याने केला असल्याची शक्यता होती. त्यानुसार वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली **(ए.टी.एम. चोरी) विशेष तपास पथक व गुन्हे शाखा, युनिट १** कडील अधिकारी, कर्मचारी हे आरोपी बाबत माहिती काढत होते. गुन्ह्याचे ठिकाण व आजुबाजुचे सी.सी.टिव्ही फुटेज चेक केले असता त्यामध्ये आरोपींनी ए.टी.एम. चोरी करण्यासाठी महिंद्रा पिकअप चा वापर केला असल्याचे दिसुन येत होते. त्यानुसार महिंद्रा पिकअप् चोरी बाबत माहिती घेता ठाणे शहर व लोणीकाळभोर पोलीस ठाणे पांढऱ्या रंगाची महिंद्रा पिकअप चोरी गेल्या असल्याचे समजले. सदरचे पिकअप गाडींचे वर्णन पाहता लोणीकाळभोर पोलीस ठाणे हद्दीतुन होळकरवाडी, औताडेफाटा येथुन दि.८/०६/२०२० रोजी चोरीस गेलेल्या महिंद्रा पिकअपचे वर्णन गुन्ह्यात वापरलेल्या पिकअप गाडीशी जुळत होते. त्यानुसार मा.पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई सो, मा.अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे सो, मा.पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ सो यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली वपोनि उत्तम तांगडे, सपोनि गणेश पाटील, सतिश व त्याचे पथकाने लोणीकाळभोर पोलीस स्टेशन येथे जावुन पिकअप गाडीचे मालकाची माहिती घेवुन होळकरवाडी, औताडे फाटा येथे जावुन पिकअप मालकास भेटुन गाडी लावलेले ठिकाण, चोरीस गेलेली वेळ या बाबत माहिती घेतली. त्यांना त्यांची माहिंद्र पिकअप् गाडी ही वडकीफाटा, सासवडरोड येथे मिळुन आली असल्याचे सांगितले.

पोलीस तपास पथकाने तात्रिंक विश्लेषण करून तसेच रस्त्यावरील ठिक ठिकाणचे असे ९० च्या आसपास सी.सी. टिव्ही फुटेज चेक केले असता गाडी ही हडपसर येथे गेली असल्याचे दिसुन आले. टेम्पो हा प्रथम हडपसर, मांजरी येथे गेला व थोड्यावेळाने मांजरी येथुन सासवडच्या दिशेने गेल्याचे दिसल्याने तपासाची दिशा निश्चीत केली. तसेच टेम्पो सोडुन पॅशन मोटार सायकलीवरून येणाऱ्या इसमाचे सुध्दा सी.सी.टिव्ही फुटेज प्राप्त केले. आरोपीचा शोध घेणे कामी सलग ३ दिवस हडपसर मांजरी भागात थांबुन बातमीदार व नविन बातमीदार तयार करून त्यांना सी.सी. टिव्ही फुटेजमधिल पॅशन मोटार सायकलीवरील इसमाचे फुटेज दाखवुन माहिती काढण्याबाबत सांगितले. त्यानुसार बातमीदार याने दिलेल्या माहिती नुसार हडपसर येथील महात्माफुलेनगर भागात सापळा लावुन रेकॉर्ड वरील गुन्हेगार नामे १) **अजयसिंग अर्जुनसिंग दुधाणी, वय २० वर्षे, रा. ७२ वस्ती, मांजरी बुद्रुक, हडपसर, पुणे**, २) **शेऱ्या उर्फ श्रीकांत विनोद धोत्रे, वय २३ वर्षे, रा.वेताळ बाबा वसाहत, सर्व्हे नंबर ५, गाडीतळ, हडपसर, पुणे व त्यांचा अल्पवयीन साथीदार** यांना मोठ्या सिताफीने पकडुन ताब्यात

घेतले. त्यांच्याकडे गुन्ह्याबाबत तपास करता त्यांनी त्यांचे इतर तीन साथीदारासह वरील गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे.

यातील आरोपी व त्यांचे साथीदार यांनी ए.टी.एम. मशिन चोरी करीता होळकरवाडी येथुन एक महिंद्रा पिकअप चोरी केली. चोरी केलेला पिकअपचा वापर करून ए.टी.एम. मशिनचोरी करून चोरी केलेले ए.टी.एम. मशिन मांजरी भागात मुळामुठा नदीकिनारी नेवुन मशिन तोडुन त्यामधिल रोख रक्कम काढुन वाटुन घेवुन ए.टी.एम. मशिन नदीमध्ये फेकुन दिली व चोरून आणलेली पिकअप वडकीफाटा, सासवडरोड येथे रस्त्यामध्ये सोडुन दिली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपी यांनी ए.टी.एम. मशिन तोडुन ते मुळामुठा नदिमध्ये खोल पाण्यात फेकुन दिले होते. सदर मशिनचा लोहचुबकाच्या सहायाने नदीमध्ये शोध घेवुन बाहेर काढुन जप्त करण्यात आले आहे. तसेच आरोपी यांनी वापरलेला **महिंद्रा पिकअप ३,००,०००/- चा,ए.टी.एम.मशिन ३,५०,०००/- रू चे**, आरोपीकडे मिळालेला **रोख रक्कम १,४०,०००/- रू, ए.टी.एम.ओढण्यासाठी वापरलेला लोखंडी रोप, इलेक्ट्रीक केबल तसेच ए.टी.एम. मशिन कापण्यासाठी करीता वापरलेले हॅण्ड ग्रॅन्डर असा १८,०००/- चे, लोखंडी खंजीर १,०००/- रू चा तसेच हिरो होन्डा पॅशन मोटार सायकल कि.रू.४०,०००/-ची** असा **एकुण ७,४९,०००/- चा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीकडून ए.टी.एम चोरीच्या गुन्ह्या बरोबरच खालील गुन्हे केल्याचे उघड झाले आहे.

**१) लोणी काळभोर पो.स्टे.पुणे ग्रामीण गु.रजि.नं.४१०/२०१० भादवि कलम ३७९**
**२) सासवड पो.स्टे.पुणे ग्रामीण गु.रजि.नं.४९०/२०२० भादवि कलम ४५७,३८०**
**३) सासवड पो.स्टे.पुणे ग्रामीण गु.रजि.नं.४९१/२०२० भादवि कलम ३७९**
**४) सासवड पो.स्टे.पुणे ग्रामीण गु.रजि.नं.४९७/२०२० भादवि कलम ४५७,३८०**

आरोपी **अजयसिंग अर्जुनसिंग दुधाणी** हा पोलीस रेकॉर्ड वरील गुन्हेगार असुन त्याचेविरूध्द पुणे शहर व जिल्ह्यामध्ये **जबरी चोरी, घरफोडी चोरी, इतर चोरी** असे **एकुण १६ गुन्हे दाखल** आहेत. गुन्हे शाखा, युनिट १ व एस.आय.टी पथकाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी निरंतर ५ दिवस अहोरात्र मेहनत घेवुन सदरचे गुन्हे उघडकीस आल आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर.आर.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहा.पोलीस निरीक्षक गणेश पाटील, सतिश कांबळे, पोलीस कर्मचारी रविंद्र गावंडे, प्रमोद लांडे, सोमनाथ बोऱ्हाडे, अमित गायकवाड, महादेव जावळे, सचिन उगले, नितीन खेसे, प्रविण पाटील, विशाल भोईर, किशोर परदेशी, सचिन मोरे, विजय मोरे, गणेश सावंत, मारूती जायभाये, प्रमोद हिरळकार, आनंद बनसोडे, प्रमोद गर्जे, अजनराव सोडगिर यांनी केली आहे.